# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/१०/२०२५ ( शनिवार )**

---

**ड्रोन कॅमेऱ्याद्वारे द्वारे पेट्रोलींग करून मोहाफुल हातभट्टीची दारू काढणाऱ्या १२ आरोपीतांवर गुन्हे नोंद, ३ लाख ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर, कळमेश्वर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची संयुक्त कारवाई**

दिनांक ०४/१०/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर यांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील गौंडखैरी बरड येथे मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात कळमेश्वर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी दंगा नियंत्रण पथकासह संयुक्तरित्या कारवाई करत **ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून घटनास्थळी जावुन आरोपीतांच्या घरामध्ये सुरू असलेल्या मोहफूल गावठी दारू भट्टयांवर कारवाई केली. अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या १२ आरोपीतांवर गुन्हे नोंद केले.**

**आरोपी नामे १) आणेकर श्याम पवार, वय २८ वर्षे, आणि ११ महीला आरोपी सर्व राहणार गोंडखैरी बरड, ता. कळमेश्वर अशा आरोपीतांवर कारवाई करत ६२० लिटर मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू किंमती ६२,००० /— रूपये, ७,९०० लिटर मोहाफुल सडवा किंमती २,८४,५०० /— रूपये, लोखंडी ड्रम ,प्लॅस्टिक ड्रम आणि इतर साहित्य**

असा एकुण ३,८९,१०० /— रूपये असा मुद्देमाल जप्त करून नाशवंत मुद्देमाल नाश करण्यात आला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.









**अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ११ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. रोख रक्कमेसह १५ मोबाईल, ४ दुचाकी असा एकुण ६ लाख २४ हजार ३५० रूपयांचा मुद्देमाल जप्त,**

**स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०३/१०/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण चे पथक पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, बेलोना येथील

दिनेश थेटे यांच्या शेताच्या बाजुला सार्वजनिक जागेवर बॅटरी च्या प्रकाशात काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन सापळा लावुन धाड टाकली असता आरोपी नामे १) सुनिलसिंग शेरसिंग बावरी, वय ४७ वर्ष, रा. वार्ड नं २ मुलताई रोड, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती, २) उत्तम लक्ष्मण लाड, वय ४७ वर्ष, रा. मुक्तापुर पेठ ता. नरखेड, जि. नागपुर, ३) श्याम महाविर बिजवे, वय ३५ वर्ष, रा. शहापुर ता वरूड जि. अमरावती, ४) मनिष महाविर चव्हाण, वय ३१ वर्ष, रा. बेलोना वार्ड नं ४ ता. नरखेड जि. नागपुर, ५) अजय कचरू बागडे, वय ३० वर्ष, रा. टेकाडी, कान्हादेवी ता. पारशिवनी जि. नागपुर,६) हर्षल रमेश देवगडे, वय २४ वर्ष, रा. वार्ड नं २, पुसला, ता. वरूड जि. अमरावती, ७) कमल गुलाबसिंग सिखलवार, वय ३४ वर्ष, रा. बेलोना, ता.नरखेड जि. नागपुर, ८) सागर फुलदास महंत, वय ४२ वर्ष, रा. वार्ड नं १ नरखेड, ता. नरखेड जि. नागपुर,९) नरेंद्र रामभाउ कोहळे, वय ५७ वर्ष, रा. सुरळी, ता. वरूड जि. नागपूर, १०) शेख हबीब शेख शरीफ, वय ६१ वर्ष, रा. वार्ड नं १६ वरूड ता. वरूड जि. नागपुर आणि ११) पप्पु कमल देलवार, वय ३८ वर्ष, रा. वसई वार्ड, नं १९, पांढुर्णा ता.जि. पांढुर्णा हे आरोपी ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम ७१,६००/— रूपये, १५ मोबाईल किंमती २,७५,५००/— रूपये ४ मोटर सायकल कंमती २,६०,००० /— रूपये, ४) तासपत्ते, दरी, ताडपत्री, २ बॅटऱ्या असा एकुण ६,२४,३५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## खुन करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन केळवद :—** जाटामखोरा येथील गांधी यांचे शेत आरोपी क्रं १) मनिष उईके, वय ४० वर्ष रा. दिघोरी, ता.जि. पाढुर्णा याने ठेक्याने घेतले असुन आरोपी क्रं २) कैलाश गोडबोले,वय ४५ वर्ष, रा गोंडी वाढोणा, हा सदर शेतात रखवाली करतो. दिनांक ०३/१०/२०२५ रोजी मृतक नामे वामण मोहन इरपाची, वय ६२ वर्ष, रा. कडंभा, ता. काटोल ह.मु. जटामखोरा हे जाटामखोरा येथील गांधी यांचे शेतातील मक्याचे कणीस घेत असतांना आरोपी क्रं १ याने मृतकाला तु मक्याचे कणीस का चोरून नेत आहे. असे म्हटल्यावरून आरोपी आणि मृतक यांचेमध्ये बाचाबाची झाली. तेव्हा आरोपी क्र २ कैलाश गोडबोले, याने मृतकाचे दोन्ही हात पकडुण व आरोपी क्र १ मनिष उईके याने त्याचे जवळ असलेल्या काठीने मृतकाचे छातीवर डोक्यावर मारहाण करून पाण्याचे खड्डयात ढकलुन

जिवानीशी ठार केले. अशा रिपोर्टवरून आरोपीतांविरूद्ध कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**केळवद पोलीसांनी तात्काळ दोन्ही आरोपीतांना अटक केली आहे. मा. न्यायालयाने नमुद आरोपीतांचा दिनांक ०५/१०/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मध्य मंजुर केला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६५९ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०४/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६५९ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३२ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३१ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १४७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने